# अर्जाचा नमुना

विभागांतर्गत सुरु असलेल्या न्यायालयीन प्रकरणांशिवाय जनहित याचिका, मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय येथील याचिकांच्या अनुषंगाने शपथपत्र/प्रतिज्ञापत्र विहित कालावधीत सादर करणे व तद्नुषंगिक कामे इ.साठी सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

| | | |
|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नांव | :-........................................ |
| २) | अर्जदाराचा पत्ता | :-........................................ |
| ३) | सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम | :-........................................ |
| ४) | भ्रमणध्वनी क्रमांक | :-........................................ |
| ५) | जन्म दिनांक व वय | :-........................................ |
| ६) | विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? | :- होय / नाही |
| ७) | अनुभव | :- |

उपरोक्त विषयांकीत कामासाठी करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

Details on Website

जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

विभागांतर्गत सुरु असलेल्या न्यायालयीन प्रकरणांशिवाय जनहित याचिका, मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय येथील याचिकांच्या अनुषंगाने शपथपत्र/प्रतिज्ञापत्र विहित कालावधीत सादर करणे व तद्नुषंगिक विधी विषयक कामे इ.साठी सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

**विभागाची आवश्यकता :**

विभागांतर्गत सुरु असलेल्या न्यायालयीन प्रकरणांशिवाय जनहित याचिका, मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडे देखील राज्य शासनाची सुसूत्र व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नेमकी वस्तुस्थिती प्रचलित नियम, कायदे इत्यादी च्या दृष्टीकोनातून सादर करण्यासाठी तसेच याचिकांच्या अनुषंगाने शपथपत्र/प्रतिज्ञापत्र विहित कालावधीत सादर करणे व तद्नुषंगिक विधी विषयक कामे इ.साठी संबंधित अधिकाऱ्यांना मदत करणे यासाठी विधी अधिकारी यांची अत्यंत आवश्यकता भासते. यानुषंगाने मंत्रालयीन विभागात अवर सचिव दर्जाचा विधी अधिकारी म्हणून किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या व मागील २ वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अवर सचिव दर्जाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नेमणूक करावयाची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती केवळ १ वर्षाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) विभागास आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या व मागील २ वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज विहित नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलेखित करावा.

५) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसापर्यंत " अवर सचिव (गृव्य), ३ रा मजला, मेन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ " या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीश: आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२७९४१४६/ २२०२३८८८ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

६) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

७) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ येथे काम करावे लागेल.

९) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे प्रधान सचिव (जसं) जलसंपदा विभाग, मंत्रालय यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१०) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

***************